॥ उपदेशपर फटका ॥

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको
चल सालसपण धरुनि निखालस खोट्या बोला बोलुं नको
अंगिं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको
नास्तिकपणिं तूं शिरुनि जनाचा बोल आपण घेउं नको
आल्या अतिथा मुठभर द्याया मागेंपुढतीं पाहुं नको
मायबापांवर रुसूं नको
दुर्मुखलेला असूं नको
व्यवहारामधिं फसूं नको
कधीं रिकामा बसूं नको
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठी करूं नको ॥ १॥

वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलुं नको
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करुनी हेवा झटूं नको
मी मोठा शाहणा धनाढ्यहि गर्वभार हा बाहुं नको
एकाहुनि चढ एक जगामधिं थोरपणाला मिरवुं नको
हिमायतीच्या बळें गरिबगुरिबांला तूं गुरकावु म् नको
दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको
विडा पैजेचा उचलुं नको
उणी कुणाचे डुलवुं नको
उगिच भीक तूं मागुं नको
स्नेह्यासाठी पदरमोड कर परंतु जामिन राहुं नको ॥ २॥

उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठी करूं नको
वरी खुशामत शाहण्याचि परि मूर्खाची ती मैत्रि नको
कष्टाची बरि भाजिभाकरी तूपसाखरे चोरुं नको
दिली स्थिती देवानें तींतच मानीं सुख कधिं विटूं नको
असल्या गांठी धनसंचय कर सत्कार्यी व्यय हटूं नको
आतां तुज गुज गोष्ट सांगतों सत्कर्मा तूं टाकुं नको
सुविचारा कातरूं नको

सत्संगत अंतरूं नको
द्वैताला अनुसरूं नको
हरिभजना विस्मरूं नको
सत्कीर्ति- नौबतिचा डंका गाजे मग शंकाच नको ॥ ३॥

अनंतफंदी

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999